# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/५० /२००९

| | | |
|---|---|---|
| अर्जदार | : | श्रीमती सईदा बेगम अब्दुल रज्जाक<br>रा. कादर साहाब की मजीद्<br>मोमिनपूरा<br>नागपूर. |
| | | – विरूध्द – |
| गैरअर्जदार | : | कार्यकारी अभियंता, गांधीबाग विभाग,<br>म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,<br>नागपूर. |
| गणपूर्ती | : | 1) श्रीमती मीरा खडक्कार, सभापती,<br>ग्राहक गा–हाणे निवारण मंच<br>नाशप, नागपूर.<br><br>2) श्री एस.एफ.लांजेवार<br>कार्यकारी अभियंता तथा<br>सदस्य–सचिव,<br>ग्राहक गा–हाणे निवारण मंच<br>नाशप, नागपूर.<br><br>3) श्रीमती गौरी चंद्रायण, सदस्या<br>ग्राहक गा–हाणे निवारण मंच,<br>नाशप, नागपूर. |

–– आदेश ––

पारीत दि. ०५.१०.२००९

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक 18.08. 2009 रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

घर क्रं. ३७१ राहणार रा. कादर साहाब की मजीद् मोमिनपुरा गांधीबाग विभागाअंतर्गत राहत आहे. त्याचे राहते घरी नविन विज पुरवठा मिळण्याबाबत त्याने मंचात तक्रार दाखल केलेली आहे, आणि योग्य तो आदेश पारीत करावा म्हणून विनंती केलेली आहे.

अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष येथे प्रथम तक्रार केलेली होती कक्षातून तक्रार कर्त्याला कळविण्यात आले होते की त्याचा नविन विद्युत पुरवठा देण्याची मागणी विजेच्या जुन्या बिलाची थकबाकी भरल्यानंतरच मान्य करण्यात येईल. नियमा प्रमाणे जुनी थकबाकी असलेल्या जागेवर थकबाकीची पुर्ण रक्कम भरल्या शिवाय नविन पुरवठा देता येत नाही असे कळविण्यात आले होते. अर्जदार कक्षाच्या निर्णयामुळे समाधानी नसल्यामुळे तक्रारकर्त्यांनी सदर तक्रार मंचात दाखल केली आहे.

मंचाने दोन्ही पक्षकाराचे म्हणने दिनांक ३०.०९.२००९ रोजी एकुण घेतले.

अर्जदाराचे प्रतिनीधी श्री अब्दुल रज्जाक व कंपनीतर्फे कार्यकारी अभियंता श्री निचळे यांनी प्रतिनीधीत्व केले.

तक्रार कर्त्याने असेही म्हटले आहे की जुन्या थकबाकी बद्दल तो जबाबदार नाही, सदर जागा त्याने विकत घेतलेली असुन जागा विकत घेण्यापूर्वीची ती थकबाकी असल्याने ती थकबाकी तक्रार कर्ता भरण्यास तयार नाही.

गैरअर्जदाराने त्यांचे लिखीत म्हणणे सादर केलेले आहे तक्रारकर्ता ज्या ठिकाणी विज पुरवठा मागतो आहे त्या ठिकाणाची स्थळ तपासणीनुसार घर क्रं. ३७१ या ठीकाणी खालील तीन विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या होत्या.

1. श्री अब्दुल हफीज सत्तार ग्रा. कं. ४१००१-०१०५४६३ असा असुन थकबाकीची रक्कम रूपये ६९५४/— चुकती न केल्यामुळे मार्च 2003 ला विद्युत पूरवठा कायमचा खंडीत करण्यात आला.
2. श्री अब्दुल रहिम अब्दुल सत्तार ग्रा. कं. ४१००१-०१०५४५५ असा असुन थकबाकीची रक्कम रूपये १३७५०/— चुकती न केल्यामुळे जानेवारी 2001 ला विद्युत पूरवठा कायमचा खंडीत करण्यात आला.
3. श्री अब्दुल अजीम अब्दुल सत्तार ग्रा. कं. ४१००१-०१९०५४४७ असा असुन थकबाकीची रक्कम रूपये २०१००/— चुकती न केल्यामुळे डिसेंबर १९९५ ला विद्युत पूरवठा कायमचा खंडीत करण्यात आला.

गैरअर्जदाराने असेही म्हटले आहे की तक्रार कर्त्याने सादर केलेली घर टॅक्सपावती मध्ये अर्जदाराचा कुठेही उल्लेख नाही, तसेच जुनी थकबाकी आढळल्यास ती चुकती करण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील असे अर्जदाराने शपथेवर लिहुन दिलेले आहे. तसेच थकबाकीची रक्कम चुकती केल्याशिवाय नविन विज पुरवठा मंजुर करता येत नाही.

करिता तक्रार कर्त्याची तक्रार खारीज करण्यात यावी.

अर्जदार व गैरअर्जदाने कागदपत्र मंचासमोर दाखल केले त्याचे अवलोकन केल्यावर असे दिसुन येते की सदर घर तक्रार कर्त्याने डिंसेबर 2008 ला विकत घेतले असुन तो त्या जागेवर राहत आहे. तसेच त्याला नविन विद्युत पुरवठा मिळण्याचा अधिकार आहे. तक्रार कर्त्याची थकबाकी भरण्याची जबाबदारी ठरवतांना विद्युत विनिमयचा विचार केल्यावर असे आढळुन येते की नियम १०.५ प्रमाणे तक्रार कर्त्यास थकबाकीची पूर्ण रक्कम भरण्याची जबाबदारी नसून फक्त ६ महिन्याची थकबाकी भरणे आवश्यक आहे व ती भरल्यानंतर त्याला नविन विज पुरवठा देण्यात येईल.

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पूरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनिमय, 2005**

**विनियम 10.5** "जर मृत ग्राहक किंवा जागेचा पूर्वीचा मालक / वहिवाटदार, जसे असेल तसे, यांनी विजेचा आकार किंवा विजेच्या आकाराशिवाय अन्य कोणतीही वितरण परवानेधारकास देय असलेली रक्कम अदा करणे बाकी राहिले असेल तर तो बोजा, जागा ज्या कायदेशीर प्रतिनिधी / कायदेशीर वारस किंवा जागेचा नवीन मालक / वहिवाटदार यांच्या नावे हस्तांतरीत झाली असेल, जसे असेल तसे, यांच्यावर राहील आणि अशा कायदेशीर प्रतिनिधी / कायदेशीर वारस किंवा जागेचा नवीन मालक / वहिवाटदार यांच्याकडुन वितरण परवानाधारक वसुल करेल".

"परंतु असे की, कायदेशीर वारसाला जोडणीच्या हस्तांतरणाच्या बाबतीत, विनीयम 10.5 नुसार येणारा बोजा जास्तीत जास्त सहा महिने अगोदर पर्यतच्या कालावधीत फक्त अशा जागेला पुरविण्यात आलेल्या विजेच्या चुकत्या न केलेल्या आकारा इतकाच मर्यादीत राहतील".

तक्रार कर्ता हा मुळ मालकाचा वारसदार नाही हे कागदपत्रवरून स्पष्ट होत आहे तेव्हा 10.5 चा पंरतुका अनुसार त्याची जबाबदारी ६ महीन्याची थकबाकी इतपत राहील.

मंचापुढे दोन्ही पक्षांनी सादर केलेली कागदपत्रे, पुरावे तपासले आणि दोन्ही पक्षांचे लिखित व तोंडी म्हणणे ऐकुन घेवून मंचानी दोन्ही बाजुचा विचार करून खालील निर्णय घेतला.

# निर्णय

मंच अशा निष्कर्शास पोहचला आहे की, तक्रारकर्ता हा तिन्ही विद्युत पुरवठयांच्या एकुण थकबाकी पैकी फक्त ६ महिन्याची थकबाकी भरण्यास जबाबदार राहील. तक्रारकर्त्याचा अर्ज अशंतः मंजूर करण्यांत येत आहे.

गैरअर्जदाराला आदेश देण्यात येत आहे की तक्रारकर्त्याने ६ महिन्याची थकबाकी भरल्यानंतर, नियमाप्रमाणे 30 दिवसांचे आंत नवीन विज पुरवठा अर्जदारास देण्यात यावा.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| (एस.एफ. लांजेवार) | (श्रीमती गौरी चंद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या् | सभापती |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM
**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION CO LTD's**
NAGPUR URBAN ZONE, NAGPUR.

सदस्य – सचिव
(कार्यकारी अभियंता)
ग्राहक गा-हाणे निवारण मंच (ना.श.प.)
म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर